# नियुक्त्या

## जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

जालना जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील **सफाईगार** या पदाकरिता ७व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस–१ या सुधारित वेतन संरचनेत रुपये १५,०००/– व अधिक नियमानुसार देय भत्ते या वेतनश्रेणीत, पात्र उमेदवारांकडुन **०४ उमेदवारांची निवडसुची आणि ०४ उमेदवारांची प्रतिक्षासूची** अशी एकुण ०८ उमेदवारांची निवडसुची / प्रतिक्षासुची तयार करण्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहे.

विस्तृत जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह जिल्हा न्यायालय, जालनाचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/jalna किंवा https://court.mah.nic.in वरून **दिनांक ०४/११/२०१९**, दुपारी १२–०० वाजल्यापासून अर्जाचा नमुना व सुचना उपलब्ध राहिल व उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यातच अर्ज नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आर.पी.ए.डी.) किंवा शीघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह या कार्यालयास **दिनांक ११/११/२०१९ रोजी सायंकाळी ०५–३० पर्यंत** प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जातील.

पुढील तपशीलाकरीता जिल्हा न्यायालय, जालनाच्या https://districts.ecourts.gov.in/jalna किंवा https://court.mah.nic.in या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी.

दिनांक : ०४/११/२०१९

आदेशानुसार,

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, जालना.

जाहिरात तारीख :— 04/11/2019
अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख :— 11/11/2019

# जाहिरात

जिल्हा न्यायालय जालना आस्थापनेवरील सफाईगार या पदाकरिता उमेदवारांची प्रतिक्षा/निवड यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आर. पी.ए.डी.) किंवा शीघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह द्वारे सफाईगार पदाकरिता अर्ज असे लिफाफ्यावर लिहुन प्रबंधक, जिल्हा न्यायालय, जालना (यानंतर ज्यास संक्षेपाकरिता जिल्हा न्यायालय असे संदर्भीत केले आहे) यांच्याकडे **दिनांक 11/11/2019** रोजी संध्याकाळी 05—00 वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

या तारखेनंतर आलेले अर्ज अथवा इतर मार्गाने पाठवलेले किंवा लिफाफ्यावर सफाईगार असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. पोस्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

**सफाईगार** :—

निवड/प्रतिक्षा यादीसाठी सफाईगार पदाची संख्या **08**

सफाईगार पदाच्या पात्रतेकरीता उमेदवार

**अर्हता** :—

शरीर प्रकृतीने सुदृढ असावा.

**वयोमर्यादा** :—

या जाहिरातीच्या दिवशी उमेदवार 18 वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा. सर्वसाधारण प्रवर्गाकरीता 38 वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. मागास वर्गीय असल्यास 43 वर्षापेक्षा जास्त नसावा.

**<u>वेतनश्रेणी</u>** :–

7व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस–1 या सुधारित वेतन संरचनेत रुपये 15,000/– व अधिक नियमानुसार देय भत्ते.

**<u>उमेदवारांना सुचना</u>** :–

1. जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या–त्या विभाग / कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवुनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी उमेदवारांनी आपले अर्ज आपापल्या विभाग/कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.
2. उमेदवाराने जर निवड प्रकियेच्या संदर्भात स्वतः किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका–यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.
3. अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, जालनाचे संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/jalna and https://court.mah.nic.in यावर उपलब्ध आहे. त्या नमुन्यातच अर्ज सादर करावा.
4. उमेदवाराने प्रमाणपत्रे अथवा प्रमाणपत्रांच्या प्रती अर्जास जोडू नयेत.
5. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा येईल.
6. उमेदवाराने दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला चालू किंवा प्रस्तावीत नसल्याचे प्रमाणित करावे असल्यास त्याचा तपशिल द्यावा.
7. विहित नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज रद्द करण्यात येईल.
8. निवड समिती समान निकष लावुन अर्हता / योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व प्राप्त झालेल्या अर्जातील अल्पसुची जिल्हा न्यायालय, जालना येथील नोटीस बोर्ड व https://districts.ecourts.gov.in/jalna and https://court.mah.nic.in संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

9. सफाईगार पदासाठी अल्पसुचीत नमुद उमेदवारांची 20 गुणांची चापल्य व साफसफाई कामाचे मूल्यमापन परिक्षा घेण्यांत येईल.

10. सफाईगार पदासाठी चापल्य व साफसफाई कामाचे मूल्यमापन परिक्षेत पास झालेल्या उमेदवारांची 20 गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

11. उमेदवारांना परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्वतःच्या खर्चाने हजर रहावे लागेल.

12. सेवाप्रवेश प्रकियेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाचे सुचना आल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयाच्या सुचना पटलावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

13. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडण्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील.

**<u>सेवाप्रवेश प्रकियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.</u>**

1. दिनांक 11/11/2019 रोजी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख.

2. दिनांक 26/11/2019 रोजी निवड समिती समान निकष लावुन अर्हता / योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व प्राप्त झालेल्या अर्जातील अल्पसुची जिल्हा न्यायालय, जालना येथील नोटीस बोर्ड व https://districts.ecourts.gov.in/jalna and https://court.mah.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

3. दिनांक 26/11/ 2019 रोजी अल्पसुचीमध्ये नांव असलेल्या उमेदवारांनी दिनांक 27/11/2019 ते दिनांक 02/12/2019 (सुट्टीचे दिवस वगळुन) या कालावधीत कार्यालयीन वेळेमध्ये शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती, फोटो ओळखपत्र जसे, आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवानाची प्रत, दोन सन्माननीय व्यक्तींनी उमेदवाराचे चारित्र्य चांगले असल्याबाबतचा दिलेला चारित्र्याचा दाखला, शासन विहित करेल त्या प्राधिका—याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागु असेल तेथे, कुटुंब लहान असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (नमुना अ) जोडवा, उमेदवार शासकीय सेवेत असल्यास, विभागाचे ना—हरकत प्रमाणपत्र जोडावे, दाखल करावयात व ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे.

4. दिनांक 08/12/2019 रोजी सफाईगार पदासाठी 20 गुणांसाठी मुल्यमापन चापल्य व साफसफाई परीक्षा सकाळी 10–00 ते दुपारी 02–00 वाजे दरम्यान घेण्यांत येईल.

5. दिनांक 10/12/2019 रोजी सफाईगार पदासाठी तोंडी मुलाखती करिता निवड झालेल्या उमेदवारांची यादी व मुलाखतीचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, जालनाचे सुचना पटलावर व संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यांत येईल.
6. दिनांक 13/12/2019 रोजी सायंकाळी 04–00 वाजेपासुन जिल्हा न्यायालय, जालना येथे तोंडी मुलाखत घेण्यांत येईल.

**<u>महत्वाच्या सुचना</u>**

1. "नोंदणी कमांक" हा अर्जातील रकाना कार्यालयाद्वारे भरण्यात येईल.
2. अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, जालनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याप्रमाणेच असावा.
3. प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासुन ती फक्त 02 वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध राहील.
4. ओळखपत्र असल्याशिवाय चाळणी परिक्षा व इतर परिक्षेला बसण्यास परवानगी मिळणार नाही.

दिनांक :– 01/11/2019

आदेशावरून

प्रबंधक

जिल्हा न्यायालय, जालना.

# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना
# सफाईगार पदासाठी अर्ज

| नोंदणी कमांक (कार्यालयीन उपयोगा करीता) | | | | | |
|---|---|---|---|---|---|

नुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो स्वाक्षरी सहित)

1. अर्जदाराचे नांव : ______________ ______________ ______________

(प्रथम नांव) (पित्याचे/पतीचे नांव) (आडनांव)

2. संपूर्ण पत्ता पिनकोड कमांक सहीत : ______________________________

______________________________

______________________________

पिनकोड ______________ भ्रमणध्वनी क्र.______________

3. प्रादेशिक रोजगार विनिमय नोंदणी कमांक (असल्यास) : ______________

4. लिंग (पुरूष/स्त्री) : ______________

5. उमेदवार आधीपासुन शासकीय सेवेत कार्यरत आहे किंवा नाही. : ______________

6. जात व प्रवर्ग : ______________

7. जन्म दिनांक : _____/_____/_______

8. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय : ______ वर्षे ______ महिने ______दिवस

9. उमेदवार अविवाहित/विवाहित : ______________

10. शैक्षणिक अर्हता (असल्यास) :

| अ.क. | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

11. टंकलेखन, श्रुतलेखन आणि संगणक अर्हता (असल्यास)

| अ.क. | कोर्सचे नांव | शब्द प्रति मिनिट | शासकीय संस्था / मंडळ ज्यांनी टंकलेखन / श्रुतलेखनाचे / संगणक प्रमाणपत्र दिले | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | ग्रेड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

12. इतर कामामध्ये विशेष रूची किंवा अनुभव असल्यास (जसे स्वयंपाकी, माळी, इलेक्ट्रीक) :- ----------------------------------------

13. उमेदवाराला ओळखणा-या दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे नांवे व पत्ते तसेच त्यांचे सदरील प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करावीत. :-
1. ----------------------------------------
----------------------------------------
2. ----------------------------------------
----------------------------------------

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो/करते की मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरूध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो/करते की अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड / नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणतीही नोटीस सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल.

तसेच दिनांक 02 मार्च 2005 नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरून अपात्र ठरविण्यांत येईल.

दिनांक :-      /     /2019

अर्जदाराचे नाव व सही